# आदेश निशाणी ७० वर
## ( पारीत दिनांक १६.०१.२०२३ )

वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेचे कलम १५१ अन्वये पोलिसांची मदत मिळणेकामी दाखल केलेला आहे.

२. वादीने असे कथन केले की, वादी ही मयत कृष्णराव राउत यांची मुलगी आहे. वादीला वादीशिवाय चार बहिणी व दोन भाउ आहेत. वादीचे दोन्ही भाउ मरण पावले असून त्यांचे वारस हयात आहेत. दावा मिळकत ही वादीच्या मालकीची असून प्रतिवादीचा त्यामध्ये कोणताही संबंध नाही. भु.क्र.३६९/३१ या मालमत्तेमध्ये मयत कृष्णराव राउत यांच्या वारसांनामध्ये वाद निर्माण झाल्याने वादी व तिच्या बहिणींनी नि.दि.दावा क्र.२१४/२००१ हा चंद्रपूर न्यायालयात दाखल केला होता. तो दिनांक २५.०८.२०१० रोजी निकाली लागून त्यामध्ये भु.क्र.३६९/३१ यामध्ये वादीचा १/७ हिस्सा वेगळा करुन देण्याचा निकाल कोर्टाने दिलेला आहे. वास्तविकतः वादीच्या तिन्ही बहिणींनी त्यांचा हक्क सोडल्यामुळे त्यात वादीचा १/४ हिस्सा आहे. परंतु जिल्हाधिकारी कोर्टामध्ये अजूनही मोक्यावर प्रत्यक्ष हिस्सेवाटण्या केलेल्या नाहीत. तसेच सन २०१० मध्ये भुमिअभिलेख खात्याकडून वादीला नोटीस आलेली होती. परंतु अंतिम हुकूमनाम्याचा कोणताही आक्षेप अदयापपर्यंत पुर्ण झालेला नाही. सदर प्रकरण प्रलंबित असताना प्रतिवादींनी वादीच्या नकळत श्री.चंद्रकांत अडवाणी यांचेकडून भु.क्र.३६९/३१ ही मिळकत खरेदी करुन घेतलेली आहे. त्यामुळे चंद्रकांत अडवाणी व

इतर नि.दि.दावा क्र.२१४/२००१ यामध्ये प्रतिवादी आहेत. श्री.चंद्रकांत अडवाणी व इतर यांनी वादीचे भाउ मयत अजय व मयत भास्कर यांचेशी संगणमत करुन मयत कृष्णाजी यांना कुणीही मुली नाही असे कथन करुन राजस्व अभिलेखात स्वतःची नावे चढवून घेतलेली आहेत.

३. वादी पुढे असे कथन करतात की, प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये पक्के बांधकाम करीत आहेत. वादीने प्रतिवादीला बांधकाम करण्यापासून अडविण्याचा प्रयत्न केला असता प्रतिवादीने वादीला धमकावून लावले आहे व जानेवारी २०१५ मध्ये गैरकायदेशीर बांधकाम केले आहे. त्यानंतर वादीने गैरकायदेशीर बांधकाम करीत असल्यामुळे तात्पुरता मनाई हुकूमाचा अर्ज केला व त्याची सुनावणी दि.१४.०२.२०१७ रोजी प्रतिवादीला दावा मिळकतीत बांधकाम करु नये असे निर्देश दिले असतानाही दोन दिवसापासून प्रतिवादींनी दावा मिळकतीत पुन्हा गैरकायदेशीररीत्या बांधकाम सुरु केलेले आहे. वादीने बांधकाम थांबविण्याकरीता पोलिसात रिपोर्ट दिली असता पोलिसांनी कोणतीही कारवाई केली नाही. वादीला प्रतिवादी करीत असलेले बांधकाम ताबडतोब थांबविणे आवश्यक व गरजेचे आहे. म्हणून सदरचा अर्ज.

४. प्रतिवादीने सदर अर्जास हरकत घेवून असे कथन केले आहे, अर्जातील संपूर्ण कथन खोटे, तथ्यहीन व वेळ काढूपणाचे आहे. नि.क्र.६९ अन्वये प्रतिवादीने शपथेवर कथन केलले आहे की, त्याने कोणतेही बांधकाम केले नाही. वादीला पोलिस

मदत घेण्याचे कोणतेही कारण नाही म्हणून सदरचा अर्ज खारीज करण्यात यावा.

५. अर्ज व जवाब ऐकल्यानंतर असे दिसून येते की, प्रस्तुतचा दावा कायमच्या मनाई हुकूमासाठी दाखल केलेला असून वादीच्या कथनानुसार प्रस्तुत न्यायालयाने दिनांक १४.०२.२०१७ रोजी प्रतिवादीला दावा मिळकतीत कोणतेही बांधकाम करण्यासाठी किंवा दावा मिळकत हस्तांतरीत करण्याकरीता प्रतिबंधीत केलेले आहे. वादी हे प्रस्तुत अर्जानुसार शपथेवर कथन करतात की, प्रतिवादीने मनाईचा हुकूम असतनाही दावा मिळकतीत बेकायदेशीर बांधकाम केले आहे व करीत आहेत. सदर बाब ही प्रतिवादीने जरी नाकारलेली असली तरी प्रस्तुत कोर्टाचे आदेशानुसार दाव्याचा निकाल लागे पावेतो दावा मिळकत ही आहे त्या परीस्थितीत ठेवणे हे महत्वाचे आहे. सदर मिळकतीवर प्रवितादी हे बांधकाम करीत आहेत किंवा कसे ही बाब जरी सदयपरीस्थितीत गृहीत धरली असता सदरचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादीचे काहीही नुकसान होणार नाही. याउलट, प्रतिवादीने जर प्रतिबंधीत आदेश असतानाही बांधकाम केले तर दाव्याचे स्वरुप बदलू शकते. त्यामुळे खालील आदेश पारीत करतो.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | निशाणी ७० वरील अर्ज मंजुर करण्यात येतो. |
| २. | वादीने नियमाप्रामणे फीस भरुन दावा मिळकतीत पोलिस मदत घ्यावी. |

| | |
|---|---|
| ३. | संबंधीत पोलिस कार्यालयास आदेशीत करण्यात येते की, दावा मिळकतीस आवश्यक पोलिस मदत दयावी. |

Digitally signed by NAJIMODDIN PATHAN
Date: 2023.01.17 11:02:27 +0530

( एन. ए. पठाण )

दिनांक १६.०१.२०२३ ३रे सह दिवाणी न्यायाधीश, (वरीष्ठ स्तर)
चंद्रपूर.